सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३

# महाराष्ट्र शैक्षणिक परिसंस्था (व्यवस्थापन) अधिनियम, १९७६

(दिनांक १५ ऑगस्ट २०१२ पर्यंत सुधारित)

**Maharashtra Act No. XIII of 1976**

# THE MAHARASHTRA EDUCATIONAL INSTITUTIONS (MANAGEMENT) ACT, 1976

**(As modified upto 15th August 2012)**

[ व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६ यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित.]

२०१५

[किंमत :            ]

वि (जे) ५२१

# सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३

## महाराष्ट्र शैक्षणिक परिसंस्था (व्यवस्थापन) अधिनियम, १९७६

## अनुक्रमणिका

उद्देशिका.


| कलमे | | | पृष्ठे |
|---|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. | .. | १ |
| २. | व्याख्या. | .. | २ |
| ३. | शैक्षणिक परिसंस्थेचे व्यवस्थापन हाती घेणे. | .. | ४ |
| ४. | प्रशासक. | .. | ६ |
| ५. | सल्लागार समिती. | .. | ७ |
| ६. | प्रशासकाचे अधिकार. | .. | ७ |
| ६-अ. | प्रशासकाचे मानधन आणि सल्लागार समितीचे भत्ते यांवरील खर्च आणि परिसंस्थेच्या इतर खर्चाचा हिस्सा राज्य शासनाला देण्याचे व्यवस्थापनाचे दायित्व. | .. | ८ |
| ७. | व्यवस्थापन प्रशासकाकडे सोपविण्यास नकार दिल्यास (त्या संबंधातील) तरतुदी. | .. | ८ |
| ८. | परिसंस्था पुन्हा व्यवस्थापक वर्गाकडे सोपविणे. | .. | ९ |
| ९. | निदेश देण्याचा अधिकार. | .. | ९ |
| १०. | क्षतिपूर्ती. | .. | ९ |
| ११. | नियम. | .. | १० |
| १२. | व्यावृत्ती. | .. | १० |
| १३. | सन १९७६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १ चे निरसन व व्यावृत्ती. | .. | १० |

# सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३[1]

## [ महाराष्ट्र शैक्षणिक परिसंस्था (व्यवस्थापन) अधिनियम, १९७६ ]

[ या अधिनियमास, दिनांक १७ एप्रिल १९७६ रोजी राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर ती संमती **महाराष्ट्र शासन राजपत्र,** १९७६, भाग चार, दिनांक १८ एप्रिल, १९७६ रोजी प्रथम प्रसिद्ध करण्यात आली. ]

या अधिनियमात पुढील अधिनियमांद्वारे सुधारणा करण्यात आल्या : —

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६ (२९-७-१९८१)*

**विवक्षित शैक्षणिक परिसंस्थांच्या मालमत्तेचे व्यवस्थापन मर्यादित कालावधीसाठी हाती घेण्याची तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** सार्वजनिक हिताच्या दृष्टीने, विवक्षित शैक्षणिक परिसंस्थांच्या मालमत्तेचे व्यवस्थापन मर्यादित कालावधीसाठी हाती घेण्याची तरतूद करण्याकरिता राज्यपालांनी त्वरित कारवाई करणे जीमुळे आवश्यक झाले अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री पटली होती; आणि त्या प्रयोजनासाठी त्यांनी महाराष्ट्र शैक्षणिक परिसंस्था (व्यवस्थापन) अध्यादेश, १९७६, दिनांक १३ जानेवारी १९७६ रोजी प्रख्यापित केला होता; **महाराष्ट्र अध्यादेश १९७६ चा १.**

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्ताविसाव्या वर्षी, याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र शैक्षणिक परिसंस्था (व्यवस्थापन) अधिनियम, १९७६, असे म्हणता येईल. **संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.**

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू होईल.

(३) तो, दिनांक १३ जानेवारी, १९७६ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी महाराष्ट्र शासन राजपत्र, १९७६, भाग पाच, पृष्ठे ७१ पाहा.

* ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

**व्याख्या.** **२.** संदर्भानुसार अन्यथा अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात, —

(अ) "प्रशासक" याचा अर्थ, कलम ४ अन्वये नियुक्त करण्यात आलेला प्रशासक किंवा अनेक प्रशासक, असा आहे ;

(ब) "नियत दिनांक" याचा अर्थ, ज्या दिनांकास प्रशासकाने शैक्षणिक परिसंस्थेचे व्यवस्थापन प्रत्यक्षात हाती घेतले असेल तो दिनांक, असा आहे ;

(क) "महाविद्यालय" याचा अर्थ, राज्यामध्ये विधिअन्वये स्थापन केलेल्या विद्यापीठाने चालवलेले किंवा त्या विद्यापीठाशी संलग्न असलेले, महाविद्यालय, असा आहे ;

(ड) "समिती" याचा अर्थ, कलम ५ अन्वये नियुक्त केलेली सल्लागार समिती, असा आहे ;

(ई) "संचालक" याचा अर्थ, शिक्षण संचालक किंवा संचालक, तंत्र शिक्षण किंवा याबाबतीत राज्य शासनाकडून प्राधिकृत करण्यात आलेला कोणताही अधिकारी, असा आहे ;

(फ) "शैक्षणिक परिसंस्था" किंवा "परिसंस्था" याचा अर्थ, जिचा व्यवस्थापकवर्ग तेथे शिक्षण देण्याचे कार्य (एकमेव कार्य म्हणून किंवा इतर कार्यांबरोबर) पार पाडीत असेल अशी शाळा, महाविद्यालय किंवा इतर कोणत्याही नावाची कोणतीही परिसंस्था, असा आहे ;

(ग) "कर्मचारी" याचा अर्थ, ज्या परिसंस्थेचे व्यवस्थापन, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार, हाती घेण्यात आले आहे अशा परिसंस्थेचे कर्मचारी, असा आहे ;

(ह) शैक्षणिक परिसंस्थेच्या संबंधात "व्यवस्थापकवर्ग" याचा अर्थ,—

(१) स्थानिक प्राधिकरणाद्वारे चालवण्यात येणाऱ्या परिसंस्थेच्या बाबतीत, ते स्थानिक प्राधिकरण ;

(२) इतर कोणत्याही परिसंस्थेच्या बाबतीत, त्या परिसंस्थेच्या सामान्य प्रशासनासाठी आणि तिच्या वित्तीय नियंत्रणासाठी जबाबदार असलेली व्यक्ती किंवा व्यक्तींची संस्था (मग ती कोणत्याही नावाची असो) ; परंतु, यामध्ये राज्य शासनाकडून व्यवस्थापित परिसंस्थेचा समावेश होत नाही;

(आय) "परिसंस्थेची मालमत्ता" याचा अर्थ, संस्थेच्या मालकीची किंवा तिच्या कब्जातील सर्व जंगम व स्थावर मालमत्ता आणि अशा मालमत्तेमधील किंवा तीमधून उद्भवणारे इतर सर्व अधिकार आणि हितसंबंध आणि त्यामध्ये जमीन, इमारत आणि तदंगभूत वस्तू, क्रीडांगणे, वसतिगृहे, फर्निचर, पुस्तके, उपकरण संच, नकाशे, साधनसामग्री, भांडी, रोख रक्कम, राखीव निधी, गुंतवणुका व बँकेतील शिल्लक रकमा यांचा समावेश होतो;

(जे) "शाळा" याचा अर्थ, प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा किंवा अशा शाळेचा कोणताही भाग, शिक्षणशास्त्र विद्यालय किंवा तंत्र, व्यवसाय किंवा ललित कला यांचे शिक्षण देणाऱ्या परिसंस्थांसह पदवी पातळीच्या खालील शिक्षण किंवा प्रशिक्षण देणाऱ्या इतर कोणत्याही परिसंस्था आणि आश्रमशाळा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि भटक्या जमाती यांमधील मुलांकरिता निवासी शाळा म्हणून असणाऱ्या), असा आहे ;

**स्पष्टीकरण.**— या खंडाच्या प्रयोजनार्थ, —

(एक) "प्राथमिक शाळा" याचा अर्थ, जेथे प्राथमिक शिक्षण देण्यात येते अशी शाळा किंवा शाळेचा भाग, असा आहे ;

(दोन) "प्राथमिक शिक्षण" याचा अर्थ, राज्य शासन, वेळोवेळी निर्धारित करील अशा विषयांचे आणि अशा इयत्तांपर्यंतचे प्राथमिक शाळेमध्ये देण्यात येणारे शिक्षण, असा आहे ;

(तीन) "माध्यमिक शिक्षण" याचा अर्थ, प्राथमिक शिक्षणाच्या लगतनंतरचे व राज्य शासन, वेळोवेळी, निर्धारित करील अशा इयत्तांपर्यंत देण्यात येणारे असे सर्वसाधारण, तंत्र, व्यवसाय किंवा विशेष शिक्षण (त्यांचा कोणताही संयुक्त पाठ्यक्रम धरून), असा आहे ;

(चार) "उच्च माध्यमिक शाळा" याचा अर्थ, जेथे उच्च माध्यमिक शिक्षण देण्यात येते अशी परिसंस्था, असा आहे ;

(पाच) "उच्च माध्यमिक शिक्षण" याचा अर्थ, माध्यमिक शिक्षणाच्या लगतनंतरचे आणि भारतामध्ये विधिद्वारा प्रस्थापित विद्यापीठांद्वारे नियंत्रित केल्या जाणाऱ्या शिक्षणाच्या लगतपूर्वी देण्यात येणारे सर्वसाधारण, तंत्र, व्यवसाय किंवा विशेष शिक्षण (त्यांचा कोणताही संयुक्त पाठ्यक्रम धरून), असा आहे ;

(सहा) "शिक्षणशास्त्र विद्यालय" याचा अर्थ, पूर्वशालेय केंद्रांमध्ये आणि प्राथमिक शाळांमध्ये शिक्षक म्हणून नियुक्ती केली जाण्यासाठी व्यक्तींना अध्यापनाचे शिक्षण देणारी शाळा, असा आहे ;

(सात) "परिसंस्थेचे व्यवस्थापन हाती घेणे" याचा त्याच्या व्याकरणिक रूपभेदांसह आणि सजातीय शब्दप्रयोगांसह अर्थ, "परिसंस्थेचे व्यवस्थापन आणि अशा व्यवस्थापनाच्या संबंधात वापरण्यात येणारी परिसंस्थेची मालमत्ता हाती घेणे", असा होतो.

**शैक्षणिक परिसंस्थेचे व्यवस्थापन हाती घेणे.**

**३.** (१) कोणत्याही शैक्षणिक परिसंस्थेच्या व्यवस्थापक वर्गाने, त्यावेळी अंमलात असलेला कोणताही विधि किंवा संस्थापन समयलेख किंवा ज्याद्वारे तिच्या प्रशासनाचे नियमन केले जाते असा कोणताही संलेख (कोणतेही नियम, विनियम किंवा उपविधी यांसह) यांद्वारे किंवा तद्अन्वये, त्याच्यावर लादण्यात आलेल्या कर्तव्यांपैकी कोणतेही कर्तव्य पार पाडण्याकडे, दुर्लक्ष केले आहे किंवा तिचे व्यवस्थापन सार्वजनिक हिताला हानिकारक होईल अशा प्रकारे करण्यात येत आहे याबद्दल आणि सार्वजनिक हिताच्या आणि विशेषतः अशा परिसंस्थेत दिल्या जाणाऱ्या शिक्षणाच्या हिताच्या दृष्टीने, अशा परिसंस्थेचे व्यवस्थापन हाती घेणे इष्ट आहे, याबद्दल संचालकाची ज्यावेळी खात्री होईल त्यावेळी त्यास, त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधित काहीही अंतर्भूत असले तरी, अशा परिसंस्थेच्या व्यवस्थापक वर्गाला नियोजित कारवाईविरुद्ध कारण दर्शविण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, आदेशांद्वारे तीन वर्षापेक्षा अधिक नसेल इतक्या मर्यादित कालावधीसाठी, अशा परिसंस्थेचे व्यवस्थापन हाती घेता येईल :

परंतु, तीन वर्षांच्या कालावधीसाठी एखाद्या परिसंस्थेचे व्यवस्थापन हाती घेण्यात आले असेल अशा बाबतीत, त्या परिसंस्थेचे योग्य व्यवस्थापन होण्याच्या सुनिश्चिततेसाठी, उक्त मर्यादित कालावधी समाप्त झाल्यानंतरदेखील असे व्यवस्थापन चालू राहणे इष्ट आहे, असे संचालकाचे मत असल्यास त्यास, योग्य वाटेल अशाप्रकारे, एका वेळी एका वर्षापेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीसाठी असे व्यवस्थापन चालू ठेवण्यासाठी, वेळोवेळी, आदेशाद्वारे निदेश देता येतील. तथापि, असे व्यवस्थापन ज्या कालावधीसाठी हाती घेतले असेल तो एकूण कालावधी, कोणत्याही प्रकरणी पाच वर्षापेक्षा अधिक होणार नाही :

परंतु, आणखी असे की, व्यवस्थापकवर्ग किंवा त्याचे नियंत्रण करणाऱ्या व्यक्तींपैकी बहुसंख्य व्यक्ती अशा संघटनेच्या सदस्य असतील की, जी संघटना किंवा जिचे सदस्य किंवा तिचे नियंत्रण करणाऱ्या व्यक्ती, राज्यातील अंतर्गत सुरक्षा, सार्वजनिक सुरक्षितता आणि सार्वजनिक सुव्यवस्था राखणे यांना बाधक असणारी कामे करीत असतील किंवा कामे करीत आल्या असतील आणि अशी कार्ये संस्थेचे एकंदर व्यवस्थापन आणि प्रशासन यामध्ये प्रतिबिंबित होतात याबद्दल संचालकांची खात्री होईल अशा बाबतीत अशी कारणे दाखवा नोटीस आवश्यक असणार नाही.

(२) कोणत्याही परिसंस्थेचे व्यवस्थापन, पोट-कलम (१) अन्वये, हाती घेण्यात आले असेल अशा बाबतीत, अशा परिसंस्थेच्या व्यवस्थापनाची प्रभारी असलेली प्रत्येक व्यक्ती नियत दिनांकाच्या लगतपूर्वी त्या परिसंस्थेच्या (संचालकाच्या मते, परिसंस्थेच्या व्यवस्थापनाकरिता अत्यावश्यक किंवा आवश्यक असेल अशी मालमत्ता असणाऱ्या) मालमत्तेचा कब्जा, संचालकाच्या किंवा त्याने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या, स्वाधीन करील.

(३) कोणत्याही परिसंस्थेचे व्यवस्थापन, या कलमान्वये हाती घेतल्यानंतर, अशा संस्थेमध्ये दिले जाणारे शिक्षण चालू ठेवण्याच्या दृष्टीने आणि त्या परिसंस्थेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने संचालकास, कलम ४ अन्वये नेमलेल्या एका किंवा अधिक प्रशासकांमार्फत परिसंस्थेचे व्यवस्थापन करण्याची व्यवस्था करता येईल.

(४) संचालकाने, पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यवस्थापकवर्गाला संचालकाचा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या कालावधीच्या आत, राज्य शासनाकडे अपील करता येईल. व्यवस्थापकवर्गाने केलेले अभिवेदन आणि संचालकाचा आदेश विचारात घेतल्यानंतर राज्य शासनाला, ज्यांमध्ये, व्यवस्थापन परत देण्यासंबंधीच्या किंवा अशा परिसंस्थेचे व्यवस्थापन प्रशासकाकडे ज्या कालावधीपर्यंत निहित राहील तो कालावधी, कमी करण्यासंबंधीच्या आदेशासह, त्यास योग्य वाटतील असे आदेश देता येतील.

(५) अपिलावरील, राज्य शासनाच्या निर्णयाच्या अधीन राहून, संचालकाचा निर्णय व राज्य शासनाचा, अपिलातील निर्णय अंतिम असेल व त्यावर कोणत्याही न्यायालयात आक्षेप घेण्यात येणार नाही.

(६) ज्यावेळी एखाद्या परिसंस्थेचे व्यवस्थापन, या कलमान्वये, हाती घेण्यात आले असेल त्यावेळी प्रशासक व्यवस्थापकवर्गाकडून नियत दिनांकाच्या लगतपूर्वी, देण्यात येत असेल त्याप्रमाणे त्या परिसंस्थेच्या इमारतीचे देय असेल असे भाडे ते घेण्यास हक्कदार असलेल्या व्यक्तीला देईल. भाडे व्यवस्थापकवर्गाला देय असल्यास, असे भाडे व्यवस्थापकवर्गाला देण्यात येणार नाही, परंतु ते, परिसंस्थेचे व्यवस्थापन, परिरक्षण आणि प्रशासन यासाठी प्रशासकाच्या ताब्यात राहील.

(७) एखादी परिसंस्था प्रशासकाच्या व्यवस्थापनाखाली राहील अशा कालावधीमध्ये, —

(अ) कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या, संचालकाने मान्य केलेल्या, शर्तीमध्ये त्यांना अहितकर ठरेल अशा प्रकारे बदल करण्यात येणार नाही;

(ब) संचालकाकडून मान्य करण्यात आलेल्या आणि नियत दिनांकाच्या लगतपूर्वी परिसंस्था देत असलेल्या अशा सर्व शैक्षणिक सवलती देण्याचे चालू ठेवण्यात येईल ;

(क) तीत शिक्षण देण्याच्या तिच्या कार्याशी संबंधित अशा फीच्या रकमा, अनुदाने किंवा जमा रकमा असतील अशा परिसंस्थेच्या सर्व फीच्या रकमा, सर्व अनुदाने आणि इतर सर्व जमा रकमा, परिसंस्थेच्या प्रयोजनांसाठी खर्च करण्यासाठी प्रशासकाला उपलब्ध असण्याचे चालू राहील ;

(ड) अशा परिसंस्थेच्या व्यवस्थापकवर्गाच्या कोणत्याही सभेमध्ये संमत झालेला कोणताही ठराव, संचालकाने त्यास मान्यता दिल्याखेरीज अंमलात आणला जाणार नाही ;

(इ) एखादा कर्मचारी परिसंस्थेच्या हिताला किंवा तीमध्ये देण्यात येणाऱ्या शिक्षणाला हानिकारक ठरेल अशा प्रकारे कार्य करीत आहे, असे प्रशासकाचे मत झाल्यास, त्याने, नियोजित कारवाईविरुद्ध कारण दर्शविण्याची वाजवी संधी त्या कर्मचाऱ्यास दिल्यानंतर, त्याच्या सेवा समाप्त करणे विधिसंमत असेल ;

(फ) प्रशासकाच्या कोणत्याही आदेशाद्वारे व्यथित झालेल्या कर्मचाऱ्याला, त्याच्या सेवा समाप्त करणारा आदेश त्यास मिळाल्यापासून २१ दिवसांच्या आत संचालकांकडे अपील करता येईल ; या बाबतीतील संचालकाचा निर्णय अंतिम व निर्णायक असेल आणि त्यावर कोणत्याही न्यायालयात आक्षेप घेण्यात येणार नाही.

**प्रशासक.** **४.** (१) कलम ३ अन्वये हाती घेतलेल्या शैक्षणिक परिसंस्थेच्या व्यवस्थापनासाठी संचालक, राज्य शासनाच्या मान्यतेने, एका किंवा अधिक प्रशासकांची नियुक्ती करील. एकापेक्षा अधिक प्रशासकांची नियुक्ती करण्यात आली असेल अशा बाबतीत, राज्य शासनाला, संचालकास या बाबतीत, वेळोवेळी, देणे योग्य वाटेल, अशा निदेशांच्या अधीन राहून, प्रत्येक प्रशासकाला, त्याने पार पाडावयाच्या कर्तव्यांचे क्षेत्र, लेखी आदेशाद्वारे नेमून देता येईल.

(२) जिला शैक्षणिक परिसंस्थेच्या व्यवस्थापनाचा अनुभव असेल किंवा जिच्याकडे राज्य शासन, आदेशाद्वारे, विनिर्दिष्ट करील अशा इतर अर्हता असतील अशी व्यक्ती प्रशासक असेल.

(३) या कलमान्वये नियुक्त केलेल्या प्रशासकाच्या सेवेच्या अटी व शर्ती राज्य शासन, लेखी आदेशाद्वारे निश्चित करील अशा असतील ; आणि भिन्नभिन्न प्रशासकांना नेमून देण्यात येतील अशा कर्तव्यांच्या स्वरूपानुसार त्या प्रशासकांकरिता भिन्नभिन्न अटी व शर्ती निश्चित करता येतील.

(४) प्रशासक, परिसंस्थेच्या प्रशासनविषयक किंवा व्यवस्थापनविषयक बाबींच्या संबंधात, व्यवहार्य असेल तेथवर, समितीशी विचारविनिमय करील आणि लेखी नमूद करावयाच्या कारणांसाठी, तो समितीच्या सल्ल्याशी सहमत नसेल त्याखेरीज, अशा सर्व बाबींमध्ये समितीच्या सल्ल्याचे मार्गदर्शन घेईल. तो सहमत नसल्यास, त्याला समितीच्या सल्ल्यांकडे दुर्लक्ष करता येईल, परंतु तो संचालकाला त्याच्या असहमतीबद्दल आणि त्याने केलेल्या कार्यवाहीबद्दल कळवील. प्रशासकाने केलेली कार्यवाही संचालकाला मान्य न झाल्यास, संचालक त्याला योग्य वाटतील असे निदेश देईल आणि प्रशासक अशा निदेशांचे अनुपालन करील.

**५.** (१) कलम ३ अन्वये हाती घेतलेल्या शैक्षणिक परिसंस्थेच्या प्रशासनाच्या व व्यवस्थापनाच्या बाबतीत प्रशासकाला सामान्यपणे, सल्ला देण्याच्या प्रयोजनार्थ, राज्य शासन, एका सल्लागार समितीची नियुक्ती करील. **सल्लागार समिती.**

(२) या सल्लागार समितीमध्ये, शैक्षणिक परिसंस्थांच्या व्यवस्थापनांशी सुपरिचित असलेल्या किंवा अशा व्यवस्थापनाचा अनुभव असलेल्या तीनपेक्षा अधिक नसतील इतक्या व्यक्तींचा समावेश असेल. समितीच्या सभांचे काम पाहण्यासाठी सदस्यांपैकी एका सदस्यास त्या समितीचा सभापती म्हणून नियुक्त करण्यात येईल.

(३) समितीचे सदस्य तीन वर्षांच्या कालावधीकरिता पदावर राहतील. राज्य शासनाला कोणत्याही सदस्याला, कोणतेही कारण न देता, काढून टाकता येईल. व्यक्ती पुनर्नियुक्तीस पात्र राहील.

(४) या समितीचे सदस्य, समितीच्या सभेस उपस्थित राहण्यासाठी, राज्य शासन आदेशाद्वारे निश्चित कलीत असे, भत्ते मिळण्यास पात्र राहतील. राज्य विधानमंडळाच्या सदस्याला, तो समितीचा सदस्य म्हणून पद धारण करीत असेल तेव्हा, प्रवास भत्ता, दैनिक भत्ता किंवा अशा पदधारकाला समितीच्या सभेला उपस्थित राहण्यासाठी किंवा असा पदधारक म्हणून इतर कोणतीही कार्ये पार पाडताना केलेला वैयक्तिक खर्च भागवण्याच्या प्रयोजनासाठी देण्यात येणारा असा इतर भत्ता यांव्यतिरिक्त कोणतेही भत्ते घेण्याचा हक्क असणार नाही.

(५) प्रशासक, संचालक किंवा राज्य शासन सल्ल्याकरिता किंवा मार्गदर्शनाकरिता समितीकडे निर्दिष्ट करील अशा बाबींच्या संबंधात प्रशासकाला सल्ला देणे हे समितीचे कर्तव्य असेल. तसेच परिसंस्थेच्या प्रशासनाच्या किंवा व्यवस्थापनाच्या बाबींमध्ये प्रशासकाला, समितीस योग्य वाटेल असा सल्ला समितीने देणे, विधिसंमत असेल.

(६) समिती आपले कामकाज चालवताना संचालकास किंवा राज्य शासनास देणे योग्य वाटेल अशा निदेशांच्या किंवा अनुदेशांच्या अधीन राहून, तिला योग्य वाटेल अशी कार्यपद्धती निश्चित करील.

**६.** कलम ३ अन्वये हाती घेण्यात आलेल्या परिसंस्थेचा कारभार, प्रशासक, अशा परिसंस्थेच्या व्यवस्थापनाचे विनियमन करणारे नियम, विनियम किंवा उपविधी किंवा इतर कोणताही संलेख यानुसार करील. असे नियम, विनियम किंवा उपविधी किंवा असा संलेख यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी प्रशासकाला, संचालकाच्या मान्यतेच्या अधीन राहून, प्रसंगाची निकड लक्षात घेऊन, त्याला योग्य वाटेल अशा प्रकारे, परिसंस्थेचा कारभार चालवता येईल. **प्रशासकाचे अधिकार.**

**प्रशासकाचे मानधन आणि सल्लागार समितीचे भत्ते यांवरील खर्च आणि परिसंस्थेच्या इतर खर्चाचा हिस्सा राज्य शासनाला देण्याचे व्यवस्थापनाचे दायित्व.**

[1][ ६-अ (१) कोणत्याही परिसंस्थेचे व्यवस्थापन कलम ३ अन्वये हाती घेण्यात आले असेल अशा बाबतीत : —

(अ) व्यवस्थापकवर्ग, परिसंस्थेच्या निधींमधून दरमहा, प्रशासकाचे मानधन आणि सल्लागार समितीच्या सदस्यांचे भत्ते यांवरील खर्च देईल ;

(ब) त्या परिसंस्थेचे व्यवस्थापन हाती घेण्यात आले नसते तर, कोणत्याही वर्षी, व्यवस्थापनाला परिसंस्थेच्या खर्चापैकी जेवढा खर्च भागवावा लागला असता त्या प्रमाणानुसारचा खर्च प्रारंभी, राज्य शासनाकडून सोसण्यात येईल आणि तो प्रशासकाला देण्यात येईल ; मात्र, प्रशासकाने मागणी केल्यानंतर, राज्य शासनाने अशा प्रकारे सोसलेला आणि दिलेला खर्च व्यवस्थापकवर्ग, परिसंस्थेच्या निधींमधून प्रतिवर्षी राज्य शासनाला देईल :

परंतु, प्रशासकाने केलेला, कोणताही असल्यास, अग्राह्य खर्च व्यवस्थापकवर्ग सोसणार नाही.

(२) जर अशी कोणतीही रक्कम वेळीच देण्यात व्यवस्थापकवर्गाने कोणतीही कसूर केली तर, राज्य शासन येणे रक्कम, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे, व्यवस्थापकवर्गाकडून वसूल करील.

(३) या कलमाखाली कोणतीही रक्कम देण्यासंबंधातील व्यवस्थापकवर्गाच्या दायित्वाच्या बाबत कोणतीही शंका किंवा वाद असल्यास, तो प्रश्न, निर्णयासाठी राज्य शासनाकडे निर्देशित करण्यात येईल आणि त्यावरील राज्य शासनाचा निर्णय अंतिम व निर्णायक असेल :

परंतु, असा निर्णय घेण्यापूर्वी व्यवस्थापकवर्गास आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईल.]

**व्यवस्थापन प्रशासकाकडे सोपविण्यास नकार दिल्यास (त्या संबंधातील) तरतुदी.**

**७.** (१) प्रशासकाची नेमणूक झाल्यानंतर, ज्या परिसंस्थेचे व्यवस्थापन, कलम ३ अन्वये, हाती घेण्यात आले असेल त्या परिसंस्थेचा व्यवस्थापकवर्ग परिसंस्थेचे व्यवस्थापन व परिसंस्थेची त्याच्या कब्जातील किंवा नियंत्रणाखालील (संचालकाच्या मते, परिसंस्थेच्या व्यवस्थापनासाठी अत्यावश्यक किंवा आवश्यक असेल अशी कागदपत्रे व मालमत्ता असणारी) सर्व कागदपत्रे आणि मालमत्ता प्रशासकाकडे सोपवील.

(२) पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे परिसंस्थेचे व्यवस्थापन (प्रशासकाकडे) सोपवण्यास व्यवस्थापकवर्गाने नकार दिल्यास, संचालकास किंवा याबाबतीत त्याने यथोचितरीत्या अधिकार प्रदान केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास, व्यवस्थापकवर्गाच्या कब्जात किंवा नियंत्रणाखाली असलेली पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेली परिसंस्थेची कागदपत्रे व मालमत्ता यांसह परिसंस्थेचे व्यवस्थापन प्रशासकाकडे ताबडतोब सोपवण्याचा निदेश, व्यवस्थापकवर्गाला, लेखी आदेशाद्वारे देता येईल.

---

१. सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६ याच्या कलम २ अन्वये कलम ६-अ समाविष्ट करण्यात आले.

(३) ज्या व्यवस्थापकवर्गास, पोट-कलम (२) अन्वये निदेश देण्यात आले असतील, त्या व्यवस्थापकवर्गाने त्या निदेशांचे अनुपालन न केल्यास, तिच्या व्यवस्थापनासाठी आवश्यक असेल तेथवर, त्याच्या कब्जातील किंवा त्याच्या नियंत्रणाखालील सर्व कागदपत्रे व मालमत्ता मिळविण्यासाठी संचालकास उपाययोजना करता येईल आणि त्या प्रयोजनार्थ संचालकास कोणत्याही अधिकाऱ्यास, झडतीचे
**१९७४ चा २.** अधिपत्र काढण्यास आणि फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या प्रकरण ७ च्या उपबंधानुसार दंडाधिकाऱ्यास वैधरीत्या ज्या अधिकारांचा वापर करता येतो अशा सर्व अधिकारांचा वापर त्याप्रमाणे त्याबाबतीत करण्यास, प्राधिकृत करता येईल. अशा प्रकारे मिळविलेली कागदपत्रे व मालमत्ता प्रशासकाकडे सोपविण्यात येईल.

**परिसंस्था पुन्हा व्यवस्थापक वर्गाकडे सोपविणे.**

**८.** (१) ज्या मुदतीकरिता कोणत्याही परिसंस्थेचे व्यवस्थापन हाती घेण्यात आले असेल ती मुदत संपल्यानंतर, प्रशासक पोट-कलम (२) च्या तरतुदींना अधीन राहून, त्या परिसंस्थेच्या मालमत्तेसह परिसंस्था संबंधित व्यवस्थापकवर्गाकडे सोपवील ;

(२) परिसंस्था व्यवस्थापकवर्गाकडे सोपविण्यापूर्वी प्रशासकास, परिसंस्थेच्या योग्य प्रशासनाच्या
**१९५० चा २९.** हिताच्या दृष्टीने, व्यवस्थापनाची योजना निश्चित करण्यासाठी धर्मादाय आयुक्तांकडे अर्ज करता येईल आणि त्यानंतर मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० याच्या कलम ५०-अ अन्वये धर्मादाय आयुक्ताने, तयार केलेल्या योजनेच्या संबंधात त्या कलमांच्या तरतुदी जशा लागू होतात तशाच त्या या योजनेसही लागू होतील ;

(३) धर्मादाय आयुक्ताने निश्चित केलेल्या व्यवस्थापनाच्या योजनेनुसार परिसंस्थेचे प्रशासन करण्यात व्यवस्थापकवर्ग कसूर करील तर, या अधिनियमान्वये परिसंस्थेचे व्यवस्थापन हाती घेतले जाण्यास ती परिसंस्था पात्र होईल :

परंतु, व्यवस्थापकवर्गास आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज कोणतीही परिसंस्था व्यवस्थापनासाठी पुन्हा हाती घेण्यात येणार नाही.

**निदेश देण्याचा अधिकार.**

**९.** या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, परिसंस्थेच्या प्रशासनाशी किंवा व्यवस्थापनाशी संबंधित अशा कोणत्याही बाबींच्या बाबतीत, राज्य शासनाला, त्यास आवश्यक वाटतील असे निदेश प्रशासकास देण्याचा अधिकार असेल, आणि प्रशासक अशा निदेशांचे अनुपालन करील.

**क्षतिपूर्ती.**

**१०.** या अधिनियमान्वये सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टींच्या संबंधात कोणत्याही व्यक्तीवर दावा किंवा खटला दाखल करता येणार नाही.

**नियम.** **११.** (१) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याकरिता, पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून, नियम करता येतील. या नियमांमध्ये या अधिनियमाच्या कोणताही प्रयोजनार्थ फी आकारण्याची किंवा अशा फीचा परतावा देण्याची तरतूद करता येईल.

(२) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे संमत होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे संमत होतील व असा निर्णय **राजपत्रात** अधिसूचित करतील तर, अशा अधिसूचनेच्या दिनांकापासून अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच नियम अंमलात येईल, किंवा, यथास्थिति, अंमलात येणार नाही. तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

**व्यावृत्ती.** **१२.** कोणत्याही अल्पसंख्याकांकडून स्थापन करण्यात आलेल्या किंवा स्थापन करावयाच्या आणि प्रशासित किंवा प्रशासन करावयाच्या कोणत्याही शैक्षणिक परिसंस्थेस — मग ती धर्मावर आधारित असो किंवा भाषेवर आधारित असो — या अधिनियमाच्या तरतुदी लागू होणार नाहीत.

**सन १९७६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १ चे निरसन व व्यावृत्ती.** **१३.** (१) महाराष्ट्र शैक्षणिक परिसंस्था (व्यवस्थापन) अध्यादेश, १९७६ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. **१९७६ चा महा. अध्या. १.**

(२) (अध्यादेश) निरसित करण्यात आला असला तरी, अशा प्रकारे निरसित झालेल्या अध्यादेशान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही (केलेली कोणतीही नियुक्ती किंवा दिलेला आदेश यांसह) ही या अधिनियमाच्या तत्सम तरतुदीन्वये केलेली किंवा, यथास्थिति, दिलेला असल्याचे मानण्यात येईल.

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६